| MHBI150002952026 | फौजदारी किरकोळ अर्ज क्रमांक २७/२०२६<br>कैलास वैजिनाथ चव्हाण विरुध्द महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस निरीक्षक, पाटोदा पोलीस ठाणे |
|---|---|

## निशाणी क्र. १ वरील आदेश

१. अर्जदार यांनी सदरचा अर्ज कलम ५०३ भारतीय नागरिक सुरक्षा संहिता, २०२३ प्रमाणे पाटोदा पोलीस स्टेशनमधील गु.र.क्र ३२१/२०२५ मध्ये जप्त केलेला ओप्पो कंपनीचा ए–३१ मोबाईल परत मिळावा याकरीता दाखल केला आहे.

२. अर्जदार यांचे असे म्हणणे आहे की, सदरचा जप्त करण्यात आलेला मोबाईल अर्जदार यांच्या मालकीचा असून अर्जदारास दैनंदिन वापराकरीता सदर मोबाईलची अत्यंत आवश्यकता आहे. मोबाईल पोलीसांच्या ताब्यात ठेऊन तपासाचा व न्यायाचा कुठलाही हेतु साध्य होणार नाही व मोबाईलची कुठल्याही प्रकारे तपास कामात आवश्यकता नाही. सदरचा मोबाईल पोलिस स्टेशनमध्ये पडून राहिल्यास त्या नुकसान होणार आहे. अर्जदार न्यायालयाने घालून दिलेल्या सर्व अटी व शर्तींचे पालन करण्यास तयार आहे. त्यामुळे सदरचा मोबाईल बॉन्डवर परत मिळावा अशी विनंती अर्जदार यांनी केली आहे.

३. तपासी अंमलदार यांनी निशाणी ७ येथे आपले म्हणणे सादर करुन मोबाईल खरेदीची पावती अर्जदाराने सादर केली नसलेने अर्जदाराचे मोबाईल मालकीबाबत साशंकता निर्माण होत आहे. त्यामुळे अर्ज नामंजुर करण्याची विनंती केली आहे. तसेच,सहा. सरकारी अभियोक्ता यांनी आपले म्हणणे दाखल करुन मोबाईल बीलाच्या पावतीवरती जी.एस.टी क्रमांक नमुद नसुन सदर मोबाईलचा ताबा अर्जदारास दिलेस मोबाईलची विक्री किंवा तबदीली करण्याची शक्यता असलेने अर्ज नामंजुर करणेची विनंती केली आहे. अर्जदारतर्फे विधीज्ञ व सहा.सरकारी अभियोक्ता यांचा युक्तीवाद ऐकला.

४. अर्जदार यांनी दाखल केलेला एफ.आय.आर व तपासी अधिकारी यांचे म्हणणेचे अवलोकन केले असता असे स्पष्ट होते की, सदरचा मोबाईल मुंबई जुगार कायदा कलम १२(अ) प्रमाणे पाटोदा पोलीस ठाणे यांचे गु.र.क्र.३२१/२०२५ मध्ये जप्त करण्यात आलेला आहे. सदर

ओप्पो मोबाईलचा मोबाईल आय.एम.ई.आय. क्र ३५६४६०००६५१५९८४६ आणि ३५६४६०००६५१५९८५३, मॉडल – ओप्पो ए-३१ असे आहे. अर्जदार यांनी निशाणी ४ सोबत अनु. क्र. १ वर मोबाईल खरेदीची पावती, अनु.क्र. ३ वर अर्जदाराचे आधारकार्डची सत्यप्रत दाखल केली असुन सदर कागदपत्राअन्वये जप्त मुद्देमाल हा अर्जदाराचे मालकीचा असल्याचे स्पष्ट होते. अर्जदार हा कल्याण मटका नावाचा जुगार खेळत व खेळवीत असतांना मिळुन आला असे अभियोगपक्षाचे कथन आहे. सदरचा जप्त मोबाईल हा जुगाराचे साहित्य म्हणुन वापरले असे अभियोगपक्षाचे कथन नाही. जप्त मुद्देमाल हा पोलिस स्टेशनमध्ये पडुन राहिल्यास तो खराब होण्याची शक्यता आहे.

**५.** मा. सर्वोच्च न्यायालय यांनी ***सुंधरभाई अंबालाल देसाई वि. स्टेट ऑफ गुजरात (सुप्रा) रिपोर्टेड इन 2003 All MR (Cri.) 363 (SC)*** या न्यायनिवाडयात मुद्देमाल परतीबाबत आदेश करताना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांना मार्गदर्शन सुचना घालून दिलेल्या आहेत. या मार्गदर्शन सुचनाप्रमाणे कोणताही मुद्देमाल १५ दिवस ते १ महिन्यापेक्षा जास्त कालावधीकरीता पोलिस स्टेशनमध्ये पडून राहता कामा नये त्याबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी यांनी योग्य ते आदेश केले पाहिजेत असे निर्देश दिले आहेत.

**६.** सदरचा मोबाईल पोलिस स्टेशनमध्ये जास्त दिवस पडून राहीलेस त्याचे नुकसान होवू शकते. अर्जदार यांच्या व्यतिरिक्त अन्य कोणीही सदर मोबाईलवर हक्क सांगितलेला नाही. त्यामुळे अशा परिस्थितीत काही अटीवर अर्जदार यांना हा मोबाईल परत देणे न्यायोचीत होणार आहे म्हणून खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

## // आ दे श //

**१.** अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

**२.** पाटोदा पोलीस स्टेशन यांचेकडील गु.र.क्र.३२१/२०२५ मध्ये जप्त केलेली ओप्पो कंपनीचा मोबाईल आय.एम.ई.आय. क्र. ३५६४६०००६५१५९८४६ आणि ३५६४६०००६५१५९८५३, मॉडल – ओप्पो ए-३१ हा अर्जदार यांनी रक्कम रुपये १०,०००/- (अक्षरी रुपये दहा हजार मात्र) चा सुपूर्दनामा पोलीस ठाणे, पाटोदा यांना सादर

करुन देणेच्या अटीवर व खालील अटीवर परत देण्यात यावी.

**अ)** अर्जदार यांनी सदर मोबाईलचा रंग अथवा बाह्य स्वरुपात या गुन्हयांचा निकाल होईपावेतो कोणताही बदल करणेचा नाही.

**ब)** अर्जदार यांनी आवश्यकता असेल तेंव्हा सदरचा मोबाईल न्यायालयात अथवा संबंधीत पोलिस स्टेशनमध्ये हजर करावे.

**क)** अर्जदार यांनी सदर गुन्ह्याचा निकालापावेतो मोबाईल कोणत्याही प्रकारे कोणासही तबदील करणेचे नाही.

**ड)** अर्जदार यांनी मोबाईलचे दोन रंगीत फोटो विविध कोनातून जवळून घेतलेले दाखल करावेत.

**इ)** अर्जदार यांनी सदरच्या मोबाईलचा वापर या गुन्ह्याचा निकालापावेतो इतर कोणत्याही गुन्ह्यात करणेचा नाही.

३) तपासी अंमलदार यांनी सदर मोबाईल अर्जदार यांच्या ताब्यात देताना त्याचा रितसर पंचनामा करुन सदरचा मोबाईल सत्वर अर्जदार यांचे ताबेत द्यावे व तसा अहवाल या न्यायालयास सादर करावा याबाबतचे सुचनापत्र तपासी अंमलदार यांना पाठविण्यात यावे.

४) या आदेशाची छायांकित प्रत पाटोदा पोलीस स्टेशन यांचे गु.र.क्र.३२१/२०२५ मध्ये ठेवणेत यावी.

**(न्यायासनावर निवेदीत व आधीघोषीत करण्यात आले)**

Digitally signed by MITHUN ASHOK SHINDE
Date: 2026.03.17 15:55:18 +0530

ठिकाण – पाटोदा (मिथुन अ. शिंदे)

दिनांक – १२/०३/२०२६ प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, पाटोदा